# सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.एसीटी/१/ ४२८
मालमत्ता कर कार्यालय,
सोलापूर .दिनांक:२५-०८-२०२२

*** कार्यालयीन आदेश ***

*** अवैध इमारतीवर तसेच वापर परवाना न घेतलेल्या इमारतीवर शास्ती लावणेबाबत ***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६७-अ सोलापूर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत सध्या अवैध इमारती /वापर परवाना/वापरात बदल/वाढील बांधकाम बाबत पुढील प्रमाणे शास्ती लावणेबाबत सोलापूर महानगरपालिका प्रशासक ठराव क्रं.४० दिनांक ०३-०६-२०२२ अन्वये धोरणात्मक मान्यता दिलेली आहे.

१) अवैध बांधकामावर मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम शास्ती लावण्याची कार्यवाही करावी.
२)बांधकाम परवानगी घेतला आहे मात्र वापर परवाना न घेतलेल्या मिळकतदारांच्या मिळकतीवरती मालमत्ता कराच्या ५०% रक्कम शास्ती लावणे.
३)ज्या मिळकतीचा ज्या वापरासाठी बांधकाम खात्याची परवानगी घेतली आहे व त्यानंतर त्याचा वापरात बांधकाम खात्याची परवानगी न घेता बदल केला असल्यास त्या मिळकतीवर मालमत्ता कराच्या ५०% रक्कम शास्ती लावणे.
४) बांधकाम परवानगी क्षेत्रा पेक्षा वाढीव बांधकाम केल्यास वाढीव बांधकामाच्या क्षेत्रावर मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम शास्ती लावणे.

सदर शास्तीचे अंमलबजावणी पुढील आर्थिक वर्षापासुन लागु करणेत येत असुन सर्व कर निरीक्षक यांनी उपरोक्त प्रमाणे मिळकतदार यांचेकडे मिळकतीचे बांधकाम परवाना /वापर परवाना आहे किंवा असे याबाबत खात्री करुन त्यानुसार कर निर्धारण व मुल्य निर्धारण करणेची कार्यवाही ठेवण्यात यावी. यामध्ये कोणत्याही प्रकारचे कसुर होता कामा नये अन्यथा संबधित सेवकांस जबाबदार धरणेत येवून मनपा अधिनियमानुसार उचित कारवाई करणेत येईल यांची नोंद घ्यावी.

मा.आयुक्त यांचे आदेशानुसार

२५/०८/२२

उपायुक्त (मालमत्ता कर)
सोलापूर महानगरपालिका

प्रत-
1.उपायुक्त (मालमत्ता कर) विभाग.
2. मुख्यलेखापरिक्षक.
3. सहा.आयुक्त (मालमत्ता कर) विभाग
प्रति-
1.अति.मालमत्ता कर अधिकारी
2.सहा.मालमत्ता कर अधिकारी
3. सर्व कर निरीक्षक / वसुली सेवक

सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.एसीटी/9/ ४२५
मालमत्ता कर विभाग
दिनांक २५/08/2022

*** कार्यालयीन आदेश ***

संदर्भ: 1) मा.म.न.पा. ठराव क्रं.193 दि.20-10-2005.
2) मा.म.न.पा. ठराव क्रं.32 दि.20-06-2009.
3) जा.क्र.एसीटी-9/197 दिनांक 19-05-2006 चे कार्यालयीन आदेश .
4) मा. प्रशासक ठराव क्रं.69 दि.15-07-2022.

सोलापूर महानगरपालिकेकडील शहर व हद्दवाढ विभागातील मिळकतीना कर आकारणी करणेकरीता उपरोक्त संदर्भ क्रं. 1 व 2 अन्वये खालीलप्रमाणे दर ठरवून दिलेले आहेत. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्रं.3 च्या आदेशान्वये आजला नवीन मिळकतीची आकारणी करतानाखालील नमूद तक्त्यामधील दरानुसार व सवलती नुसार करण्यात येते.

| अ.क्र | तपशील | शहरविभाग दर (प्रतीचौ.फुट) | हद्दवाढ विभाग दर (प्रती चौ.फुट) |
|---|---|---|---|
| 1 | ओनरशिप फ्लॅट,दुकाने,घर,रो.हाऊस | 300/- | 210/- |
| 2 | आर.सी.सी.फ्रेम स्ट्रक्चर बांधकाम | 300/- | 200/- |
| 3 | आर.सी.सी.लोड बेअरींग | 275/- | 170/- |
| 4 | विटासिमेंट,धाबा,कॉलम बांधकाम | 175/- | 125/- |
| 5 | विटासिमेंट पत्रे,पत्राशेड | 105/- | 90/- |
| 6 | संपूर्ण पत्राशेड | - | 75/- |
| 7 | झोपडी | - | 60/-प्रति200चौ.फुट |
| 8 | भाडेकरी जागा वापरात असतील तर करपात्र मुल्यामध्ये | 10% वाढ | 10% वाढ |
| 9 | भिंतीखालीलक्षेत्र | 10% वाढ | 10% वाढ |
| 10 | बांधकाम खर्चासाठीचे सवलत दर | | |
| | अ-तळमजला | पूर्ण दर | पूर्ण दर |
| | ब-पहिलामजला | 10% सवलत | 10% सवलत |
| | क-दुसरामजलाव त्यावरील मजले | 20% सवलत | 20% सवलत |
| | ड-विनावापर क्षेत्र- | 50% सवलत | 50% सवलत |
| | पॅसेज,जिना,संडास,बाथरुम,गॅलरी,पार्कींग रो-हाऊस,अर्पामेंटट मधील वापर क्षेत्र. | 50% सवलत | सवलत नाही |

उपरोक्त संदर्भ क्रं.4 चे प्रशासक यांच्या ठरावानुसार सन 2005-09 या कालावधीकरीता करपात्र मुल्य ठरविण्याकरीता बांधकामाचे खर्च दर वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या दरामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नसुन त्याच दरानुसार बांधकामाची करनिर्धारण व मुल्यनिर्धारण आकारणी करणेची कार्यवाही मालमत्ता कर विभागाने करावी.

उपरोक्त संदर्भ क्रं.4 च्या प्रशासकीय ठरावानुसार खालीलप्रमाणे बदल करणेस मान्यता दिलेली आहे. तरी खालील नमुद प्रमाणे कार्यवाही मालमत्ता कर विभागाने ठेवावी.

१) म.न.पा.च्या क्षेत्रामधील मिळकतीचे करनिर्धारण व मूल्यनिर्धारण करतेवेळी बांधीव क्षेत्रांचे मोजमापे घेऊन कर आकारणी करावी, याअगोदरच्या भिंतीखालील क्षेत्र 10 टक्के गृहीत धरण्यात येत होते त्याऐवजी 15 टक्के गृहीत धरुन नवीन कर निर्धारणानुसार आकारणी करताना कार्यवाही करावी.

२) वरील तक्त्यातील बांधकाम खर्चासाठीचे असणारे सवलतीचे दर अ.क्र.10 मधील वरील संदर्भिय क्रं. 4च्या प्रशासकीय ठरावा नुसार रद्द करण्यात आले आहेत. म्हणजेच मिळकतीचे करनिर्धारण व मूल्यनिर्धारण करताना कोणत्याही प्रकारची मूल्यनिर्धारणाच्या वेळेची सवलत यापुढे अनुज्ञेय राहणार नाही. करनिर्धारण करतेवेळी संपूर्ण बांधीव क्षेत्राचे करनिर्धारण करावे.

३) बांधकामाची आकारणी करीत असताना मा.शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयास बाधा येणार नाही याची दक्षता घेवून कर आकारणीची कार्यवाही ठेवण्यात यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी वरीलप्रमाणे नमूद केले नुसार करण्यात यावी.

मा.आयुक्त यांचे आदेशानुसार

24/8/22

उपायुक्त (मालमत्ता कर)
सोलापूर महानगरपालिका.

प्रत-
1.उपायुक्त (मालमत्ता कर) विभाग.
2. मुख्यलेखापरिक्षक.
3. सहा.आयुक्त (मालमत्ता कर) विभाग

प्रति-
1.अति.मालमत्ता कर अधिकारी
2.सहा.मालमत्ता कर अधिकारी
3. सर्व कर निरीक्षक / वसुली सेवक